MHTH070021842016

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २२/१२/२०१६ |
| नोंदणी दिनांक | : | २२/१२/२०१६ |
| निकाल दिनांक | : | २२/०८/२०२५ |
| कालावधी | : | ०८व. ०८म. ००दि. |

**<u>सह दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर कल्याण यांचे न्यायालयात</u>**
**(पीठासीन अधिकारी श्री.अ.सि.लांजेवार यांचे समोर)**

हिंदू विवाह अर्ज क्र. १२७९/२०१६
निशाणी क्र. ३१

सचिन मोहन कांबळे,
वय : ३५ वर्षे, व्यवसाय : नोकरी,
राहणार : रुम नं. २६८७, गणेश नगर,
वरचा पाडा, शिवसेना शाखे जवळ,
अंबरनाथ – पश्चिम, जिल्हा – ठाणे. **...अर्जदार**

**विरुध्द**

माधुरी सचिन कांबळे,
वय : २९ वर्षे, धंदा : गृहिणी,
राहणार : द्वारा – श्री. गोरख न्यायनित,
अे ब्लॉक ३८७ समोर, कानसई रोड,
सुभाष टेकडी, उल्हासनगर–४,
जिल्हा – ठाणे. **...सामनेवाली**

**प्रकरण – हिंदू विवाह कायदा १९५५ चे कलम १३(१)(१अ) प्रमाणे**

.........................................................................................

अर्जदारातर्फे वकिल अरविंद पी. सोनताटे
सामनेवाला तर्फे वकिल एम. ए. डेरे

.........................................................................................

**<u>न्यायनिर्णय</u>**
**(दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी पारीत)**

अर्जदाराने सदरचा अर्ज हिंदू विवाह कायदा १९५५ चे कलम १३(१)(१अ) प्रमाणे क्रूरतेच्या कारणावरुन विवाह संबंध संपुष्टात आणण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराने असे कथन केले आहे की, त्याचा सामनेवाली सोबत विवाह दिनांक ०२/०५/२००७ रोजी पार पडला. सदर वैवाहिक संबंधातुन त्यांना दोन मुली आहेत. सामनेवाली सुरुवातीपासुनच अर्जदाराशी व्यवस्थीत वागत नव्हती व त्याचे आई–वडिलांशी उध्दटपणे वागुन त्यांचा अपमान करीत असे. घरकाम करावयास टाळाटाळ करीत असे. त्यामुळे आईवडिल कंटाळुन गावी रहावयास गेले. सामनेवालीच्या उद्धट स्वभावामुळे नातेवाईकांनी सुध्दा संबंध ठेवणे बंद केले. ती सतत अर्जदाराचे चारित्र्यावर संशय घेत असे. ती सतत अर्जदाराची बदनामी करीत असे. अर्जदार व त्यांच्या मुलींकडे व्यवस्थीत लक्ष देत नसे. सर्व पगार ती स्वतःकडे ठेवून घेत असे. ती सतत आत्महत्या करुन त्यास जेल मध्ये पाठविण्याची धमकी देत असे. ती मुलींना सुध्दा मारहाण करीत असे. ती न सांगताच माहेरी

निघुन जात असे.

३. अर्जदाराने असेही कथन केले की, दिनांक १६/०८/२०१६ रोजी सामनेवाली भांडण करुन माहेरी गेली व तिचे आई–वडिलांचे घराजवळच घर विकत घेण्याचा तगादा लावला अन्यथा आत्महत्या करण्याची धमकी दिली. तिच्या विक्षीप्त वागण्याने अर्जदाराच्या प्रकृतीवर परिणाम होवून जीवाचे बरे वाईट होण्याची दाट शक्यता वाटू लागली. त्यामुळे दिनांक १८/०८/२०१६ रोजी महिला तक्रार निवारण केंद्रात सामनेवाली विरुध्द तक्रार दाखल केली. परंतु त्याचा काडीमात्र फायदा झाला नाही. त्यामुळे अर्जदाराने वैवाहिक संबंध संपुष्टात आणण्याचा निर्णय घेतला व सदरचे प्रकरण दाखल केले.

४. सामनेवालीने तिचा लेखी जबाब नि.क्र. २० नुसार दाखल केला. तिने असे कथन केलेले आहे की, लग्नानंतर सुरुवाती पासुनच अर्जदार तिच्याशी चांगले बोलत नव्हता व सतत टोमणे मारीत होता. अर्जदार तिला नेहमी म्हणत असे की ती जरी कायदेशीर पत्नी असेल तरी म्हणावे तसे प्रेम असणार नाही. परंतु संसार व्यवस्थीत होईल या आशेने ती अर्जदारासोबत नीट संसार करीत होती. लग्नानंतर चार वर्ष तिला मुलबाळ झाले नाही. त्यामुळे तिला वांझोटी असे अर्जदार तिला संबोधीत असे. त्याकारणावरुन सतत घटस्फोटाची मागणी करीत होता. तसेच सन २००९

मध्ये तिला तिचे माहेरी पाठवून दिले होते. तिच्या आई–वडिलांनी तिला सासरी नेउन सोडले असता त्यांचा अपमान करण्यात आला होता. सामनेवालीला गर्भधारणा झाली असता पहिला मुलगाच झाला पाहिजे अन्यथा घटस्फोट देईन अशी धमकी अर्जदार तिला देते असे. तिच्या गरोदरपणाचे काळात अर्जदाराने तिची काळजी घेतली नाही. दिनांक १५/०१/२०११ रोजी मुलगी झाली म्हणून तिला बघण्यासाठी अर्जदार आला नाही. अर्जदार हा सामनेवाली व त्यांच्या मुलींची काळजी घेत नव्हता. अर्जदाराने एका वर्षाने तिला माहेरी पाठवून दिले व परत न येण्यास सांगितले. तसेच दुसरे लग्न करण्याची धमकी दिली. त्यानंतर सामनेवाली मुलीला घेवून स्वतः अर्जदाराकडे आली व घरात शेजा–यांच्या मदतीने कसातरी प्रवेश केला. दिनांक ०१/०८/२०१५ रोजी दुसरी मुलगी झाल्यावरुन परत अर्जदाराने घटस्फोटाची मागणी केली. मे २०१६ पासुन अर्जदार तिच्याशी व्यवस्थीत बोलत नसे व कधी कधी दोन दोन दिवस परत येत नसे. तिला मुलीला घेवून एकटेच रहावे लागत असे. जुन २०१६ रोजी अर्जदार रात्री ०२.०० वाजता घरी आला व सामनेवाली सोबत वाद घातला व तिला मारहाण केली व तिला घराबाहेर निघुन जाण्यास सांगितले. अर्जदाराने तिच्या व मुलींच्या अंगावर रॉकेल ओतून दिले व सामनेवालीने स्वतः अंगावर रॉकेल ओतून घेतल्याचा शेजा–यांसमोर बनाव केला.

५. सामनेवालीने असेही कथन केले की ऑगस्ट २०१६ ला

अर्जदार न सांगता निघून गेला. अर्जदार हरवला याबाबतची तक्रार दिली असता अर्जदारास संसार करण्याची इच्छा नसल्यामुळे खोटे आरोप करुन तिचे विरुध्द खोटी तक्रार दिली. सामनेवाली माहेरी असतांना दिनांक ०३/१०/२०१६ रोजी अर्जदाराने तिच्याशी संसार करावयाचा नाही अशी धमकी दिली. त्यामुळे दिनांक ०४/१०/२०१६ रोजी ती सासरी गेली असता तिला मारहाण करण्यात आली. त्यामुळे तिने पोलीसांकडे तक्रार नोंदविली. सामनेवाली हिला अर्जदाराकडून कधीही सुख मिळालेले नाही. सामनेवाली यांना नेहमी शारिरीक व मानसिक त्रास सहन करावा लागला. दिनांक ०४/१०/२०१६ पासुन सामनेवाली ही तिच्या मुलीं सोबत अर्जदार यांचे घरी एकट्याच रहात आहेत व त्याने त्यांचा स्वतःहून त्याग केलेला आहे व ती अर्जदारासोबत नांदण्यास इच्छुक आहे.

६. अर्जदाराने व सामनेवालीने केलेल्या कथनानुसार खालील मुद्दे उपस्थित करण्यात येत असुन त्यावर कारणासह अनुमान खाली दिलेले आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | सामनेवाली हीने लग्नानंतर अर्जदाराला क्रूरतेची वागणूक दिली ही बाब अर्जदाराने सिध्द केली आहे काय ? | ...होकारार्थी. |

२. विवाह विच्छेदनाचा हुकुमनामा मिळण्यास अर्जदार पात्र आहे काय ? ...होकारार्थी.

३. काय आदेश व हुकुमनामा ? ...अर्ज मंजूर.

## <u>कारणमिमांसा</u>

७. अर्जदाराने प्रकरणात केलेली मागणी सिध्द करण्याकरिता स्वत:चा पूरावा नि. २७ नुसार दाखल केली. सामनेवाली हिने अर्जदारांचे साक्षीदारांचा उलटतपास घेतलेला नाही. त्यामुळे अर्जदाराने नि.२९ नुसार पुरसिस दाखल करून त्याचा पुरावा बंद केला. सामनेवालीने तिच्या बचावात स्वतःचा पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे दिनांक २८/०६/२०२४ च्या आदेशानुसार सामनेवालीचा पुरावा बंद केला. सामनेवाली तर्फे युक्तीवाद सादर करण्यात आला नाही. अर्जदारातर्फे युक्तीवाद सादर करण्यात आला.

८. **<u>मुद्दे क्र.१ व २ करिता</u> :** अर्जदाराने सामनेवाली सोबतचा विवाह विच्छेदनाकरीता क्रुरता केल्याच्या कारणावरून दाखल केलेला आहे. अर्जदाराने त्याचे अर्जात तसेच पुरावा शपथपत्रात सामनेवाली हिने केलेल्या शारिरीक व मानसिक छळाबाबत कथन केलेले आहे. अर्जदाराने त्याचे शपथपत्रात नमुद केलेले आहे की सामनेवाली सुरुवातीपासुनच त्याचेशी

व्यवस्थीत वागत नव्हती. ती अर्जदाराकडे रहात असतांना त्याचे चारित्र्यावर संशय घेत असल्याचे सांगितलेले आहे. सामनेवालीने सुध्दा अर्जदाराने तिला शारिरीक व मानसिक त्रास दिल्याचे आरोप केलेले आहेत. परंतु सामनेवालीने तिचा बचाब सादर करण्यासाठी कोणताही तोंडी तसेच कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

९. अर्जदाराने त्याचे पूराव्याचे शपथपत्रात लग्नानंतर झालेल्या मानसिक छळाबाबतचे विस्तृत असे वर्णन केलेले आहे. परंतू सामनेवाली हिने त्या मुद्यांवर अर्जदाराची उलटतपासणी घेतलेली नाही. सामनेवाली हिने तिचे बचावाचे पुरावा देवुन व अर्जदाराचे साक्षीदारांचा उलटतपास घेवून अर्जदाराचे कथन खोटे असल्याचा प्रयत्न सुध्दा केलेला नाही.

१०. अर्जदार व सामनेवाली यांचा विवाह दिनांक ०२.०५.२००७ ला झाला. अर्जदाराचे पुराव्यास क्रूरताच्या मुद्यांचे अनुषंगाने उलटतपास न घेतल्याने तसेच बचावाच्या अनुषंगाने पुरावा सादर न केल्याने अर्जदाराचा पूरावा अमान्य करण्याइतपत न्यायालयासमोर काहीही आलेले नाही. लग्नानंतर अर्जदाराला सन्मानाची वागणूक न देणे, त्याची काळजी न घेणे याबाबी निश्चितच मानसिक व शारिरीक क्रुरता या सदरात मोडतात. वरिल सर्व कारणांचा विचार केल्यास सामनेवाली हिची वागणुक अर्जदाराच्या प्रति क्रुरतेची होती असे दिसून येते. त्यामुळे क्रुरता या कारणावरून अर्जदाराला

सामनेवाली पासुन घटस्फोट मिळण्याचा अधिकार आहे. म्हणुन मुद्दा क्र. १ व २ ला होकारार्थी उत्तर देण्यात येत आहे.

११. **मुद्दे क्र. ३ करिता :** सामनेवाली हिची वागणुक अर्जदाराचे प्रति क्रुरतेची होती या कारणावरून अर्जदार हा विवाह विच्छेदन करून मिळण्यास पात्र आहे. तरी मुद्दा क्र. ३ चे उत्तर अंतिम आदेशाप्रमाणे देण्यात येवून खालील प्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.
२. सचिन मोहन कांबळे व माधुरी सचिन कांबळे यांचेमध्ये दिनांक ०२.०५.२००७ रोजी झालेल्या विवाहाचे या आदेशाचे तारखेपासून विच्छेदन झाले असे जाहीर करण्यात येत आहे.
३. हुकूमनाम्याची प्रमाणित प्रत दोन्ही पक्षास मोफत देण्यात यावी.
४. येणेप्रमाणे हुकूमनामा करणेत यावा.

सही/–

(अ.सि.लांजेवार)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
कल्याण.

दिनांक : २२.०८.२०२५